नियमीत फौजदारी खटला क्र. **७१/२०२४**
निशाणी क्र. **१६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **प्रकाश जगन्नाथ ठाकूर** |
| वय सुमारे | : | ७० वर्षे, व्यवसाय : शेती |
| निवासस्थान | : | मु. सहाणगोठी, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहा. सरकारी वकील श्री. प्रसाद पाटील यांचेमार्फत</u>** :

घटना दि. २२/०३/२०२४ रोजी रात्री १०.१५ वाजता घडली. घटनेच्या पूर्वी २० दिवस आधी शेडचा पत्रा तुटला होता त्यावेळी मी नरेशला विचारले होते की कोण भरुन देईल? त्यावेळी तो मला म्हणाला होता की, मी नवीन बनवून देईन. सदरचा पत्रा हा रस्त्याचे काम चालू असताना तुटला होता. पंचायतीमार्फत रस्त्याचे काम चालू होते. नरेश हा पंचायत सदस्य असल्याने त्याने सांगितले होते की ते भरुन देतील.

०२ दि. २२/०३/२०२४ रोजी रात्री १०.१५ वाजता नरेश वर्तक माझ्या घरासमोरुन जात असताना मी त्याला विचारले की, माझा पत्रा तू कधी बनवून देणार? त्यावर तो म्हणाला की, आता बनवून देणार नाही, तुला काय करायचे ते कर. आमच्यात वाद चालू असताना गुरुनाथ सदानंद पोईलकर हा पाठीमागून आला. तो घरातून कोयता घेवून आला व माझी झाडे तोडू लागला. त्यानंतर त्याचा भाऊ नवनाथ आला व तोही शिवीगाळ करु लागला. 'भेंदचोद, मादरचोद, तू घरातून बाहेर ये तुला ठार मारुन टाकतो.' अशी शिवीगाळ करु

लागला. त्यानंतर त्या तिघांनी आमच्या अंगणातील बांबू व पत्र्याची मोडतोड केली. त्यानंतर ते दोघे घरात आले. नवनाथ याने घराच्या दरवाजावर लाथ मारली आणि मला माझा डावा हात पकडून बाहेर ओढले आणि कोयत्याची मूठ माझ्या तोंडावर गुरुनाथ याने मारली. मी रक्तबंबाळ झालो. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात आलो. त्यानंतर पोलीसांनी मला सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविले. मला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर मी आरोपींवर केस केली. मला तक्रार दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेली तक्रार तिच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. पी–१** म्हणजेच **निशाणी क्र. १७** देण्यात येते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखू शकेन. आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. मला ज्या कोयत्याने मारहाण झाली तो दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला कोयता तोच आहे. त्यास **मटेरियल ऑब्जेक्ट–१** (MO-1) देण्यात येते.

०३. सदर घटनेच्या तपासाकरीता पोलीस माझ्या घरी आले होते. त्यावेळी मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले. आरोपीने कोयत्याच्या मुठीने माझ्या ओठावर मारले होते. मला ओठावर टाके पडले होते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत</u>** :

०४. हे म्हणणे खरे आहे की, माझे पत्र्याचे शेड तुटले होते ही वेगळी घटना होती व बांबूच्या आणि झाडाच्या फांद्या तोडल्या ही वेगळी घटना होती.

हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घरासमोरुन सार्वजनिक रस्ता जातो. हे म्हणणे खरे आहे की, सार्वजनिक रस्त्याचे काम पंचायत करत होती. हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक हा कंत्राटदार नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, कंत्राटदार किंवा ग्रामपंचायत नुकसान भरपाई भरुन देत असते.

**प्रश्न** : कायद्याने नुकसान भरपाई करुन देण्यास नरेश वर्तक बांधील नव्हता?

**उत्तर** : त्याने होकार दिला होता.

**प्रश्न** : नरेश वर्तक याने ग्रामपंचायतीमध्ये सरपंच, ग्रामसेवक यांच्या समक्ष नुकसान भरपाई करुन देण्याची कबुली दिली होती का?

**उत्तर** : नाही.

हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक याने मला कोणतीही लेखी हमी देखील दिली नव्हती.

०५. हे म्हणणे खरे आहे की, नवनाथ व गुरुनाथ हे माझे शेजारी आहेत. हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक हा माझा शेजारी नाही. हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तक याचा माझ्या झाडांशी काहीही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, नवनाथ व गुरुनाथ यांच्याशी झालेल्या वादाशी नरेश वर्तक याचा काहीही संबंध नव्हता. पोलीसांना फिर्याद देताना मी नरेश वर्तक याने माझे पत्रे तोडले ही बाब सांगितली नव्हती.

०६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शेवग्याच्या झाडाच्या फांद्या रस्त्यावर आलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, नवनाथ व गुरुनाथ ह्या

घटनेपूर्वी माझे दुश्मन नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, नवनाथ व गुरुनाथ यांनी मला झाडांच्या फांद्या तोडण्यास सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या घराच्या आजूबाजूला दाट लोकवस्ती आहे. आमचा वाद अर्धा तास चालू होता. हे म्हणणे खरे आहे की, वाद बघण्यासाठी आजूबाजूचे अनेक लोक उभे होते. हे म्हणणे खरे आहे की, बरेच त्रयस्थ इसम तेथे उभे होते.

०७. हे म्हणणे खरे नाही की, फांद्या कधी तोडल्या होत्या हे मी पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, फांद्या तोडताना मी आरडाओरडा करुन लोक जमविले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी लोकांच्या निदर्शनास आणून दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सार्वजनिक रस्त्यावर लाईटचे पोल आहेत.

०८. आरोपीने मला तोंड पकडून मारले नव्हते. माझ्या नाकावर मारले नव्हते ओठावर मारले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला घटनेपूर्वी दोन दिवस आधीच लागले होते. मी माझी पत्नी व मुलासोबत दवाखान्यात गेलो होतो. माझ्या पत्नीने डॉक्टरांना सांगितले होते की कोयत्याच्या दांडक्याने ओठावर मारले होते. मी तीन दिवस दवाखान्यात होतो. हे म्हणणे खरे आहे की, मी तीन दिवसांनंतर दवाखान्यातून आल्यावर फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, तोपर्यंत सदरची घटना कोणालाच माहिती नव्हती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, माझ्यात व आरोपींमध्ये राजकीय पक्षीय वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींना त्रास देण्याकरीता खोटी केस केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी माझ्या झाडाच्या फांद्या

तोडल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडलेली नसताना मी खोटी फिर्याद दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नरेश वर्तक हा ग्रामपंचायत सदस्य असल्याने त्याला त्रास देण्याकरीता मी खोटी केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मटेरियल ऑब्जेक्ट—१ (MO-1) कोयता हा माझ्या घरातील आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातील घरात कोयते असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी अंदाजाने आज कोयता ओळखलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घरात काम करताना माझ्या ओठाला लागले होते.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **०४/०९/२०२५**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड—अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७१/२०२४**
निशाणी क्र. **२१/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **समिर प्रभाकर पाटील** |
| वय सुमारे | : | ४२ वर्षे, व्यवसाय : पोलीस पाटील |
| निवासस्थान | : | मु. कावीर, पो. बामणगाव, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत</u>** :

दि. २४/०३/२०२४ रोजी मला आंबेतकर पोलीसांनी घटनास्थळ पंचनाम्यासाठी बोलावले होते. घटनास्थळी मी, आंबेतकर पोलीस, दुसरा पंच रणजित तुणतुणे व फिर्यादी प्रकाश ठाकूर हजर होते. ठाकूर याने घटनास्थळ दाखवले. घटनास्थळ त्यांचे घर होते. अंगण व ओटी हे घटनास्थळ होते. घटनास्थळी अंगणाला लादी बसवलेली होती. पत्रा थोडा बेंड झाला होता. फिर्यादीने सांगितले की, आरोपीने त्यावर लाथ मारली होती. पोलीसांनी त्या ठिकाणी पंचनामा केला. पंचनामा मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २२** देण्यात येते. पोलीसांनी मला सायं. ४:०० वाजता बोलावले होते. आरोपीने वापरलेला कोयता तेथे जप्त केला. गुरुनाथ याने कोयता आणून दिला होता. कोयत्याला लाकडी मूठ होती. कोयता मला दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला मटेरियल ऑब्जेक्ट–१ (MO-1) कोयता तोच आहे. पोलीसांनी जप्ती पंचनामा केला. आता मला दाखवण्यात आलेला जप्ती पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. २३** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत</u>** :

०२. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस पाटील असल्यामुळे पोलीसांनी बोलावल्यावर मी पंचनाम्यासाठी जातो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळी घरामध्ये काही खाणाखुणा दिसल्या नव्हत्या. १० ते १५ फुटांवर पत्रे होते. हे म्हणणे खरे आहे की, मला तो पत्रा चेपल्यासारखा वाटला होता. हे मी सांगू शकत नाही की, झाडाची फांदी पडल्यामुळे तो पत्रा चेपला होता. हे मी सांगू शकत नाही की, लाथ मारल्यामुळे तो पत्रा चेपला होता. हे म्हणणे खरे आहे की, पंचांना काय घडले होती याची माहिती मिळाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस ठाण्यात गेलो तेव्हा तो कोयता पोलीस ठाण्यात होता. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी मला त्या केसमध्ये दुसरा पंचनामा करायचा आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, आंबेतकर पोलीस यांनी मला सांगितले होते की, पोईलकर यांच्या घरातील हा कोयता आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे प्रत्यक्षात कोणत्याही आरोपीशी बोलणे झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, गावातील घरात कोयते असतात. हे म्हणणे खरे नाही की, आंबेतकरांच्या सांगण्यावरुन मी पंचनाम्यावर सह्या केलेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **०९/१०/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **७१/२०२४**
निशाणी क्र. **२६/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **संध्या प्रकाश ठाकूर** |
| वय सुमारे | : | ६० वर्षे, व्यवसाय : गृहीणी |
| निवासस्थान | : | मु. सहाणगोठी, ता. अलिबाग, जि. रायगड |

<u>**सरतपासणी सरकारतर्फे सहाय्यक सरकारी वकील श्री. पी.एस्. पाटील यांचेमार्फत**</u> :

०१. दि. २२/०३/२०२४ रोजी रात्री १०:१५ वाजता घटना घडली. आमच्या शेडचा पत्रा तुटला म्हणून आम्ही नरेश वर्तकला त्याबाबत विचारणा केली की पत्रा कोण बसवून देणार? त्याने त्याबाबत आधी तयारी दर्शविली होती त्यानंतर दि. २२/०३/२०२४ रोजी त्याने सांगितले की तुम्हाला जे काय करायचे ते करा. त्याने 'मादरचोद, भेंदचोद' अशी शिवीगाळ केली.

०२. गुरुनाथ सदानंद पोईलकर हा आला व त्याने आमच्या झाडाच्या फांद्या कोयत्याने तोडल्या. गुरुनाथने, 'घरातून बाहेर ये, तुला ठार मारीन' अशी धमकी दिली. आम्ही आमच्या ओटीवर थांबलो होतो. नवनाथ पोईलकर आला व त्याने दरवाजावर लाथ मारली. माझ्या पतीला डाव्या हाताने बाहेर खेचले. गुरुनाथने कोयत्याची मूठ माझ्या पतीच्या तोंडावर मारली त्यामुळे त्यांचे रक्त वाहू लागले. नरेश वर्तक, गुरुनाथ पोईलकर व नवनाथ पोईलकर यांनी आमचे पत्र तोडून रस्त्यावर फेकाफेक केली.

०३. पतीचे रक्त वाहू लागले त्यामुळे आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. तेथून माझ्या पतीला सिव्हील हॉस्पीटलमध्ये पाठविण्यात आले. तेथे माझ्या पतीला टाके

टाकण्यात आले. माझ्या पतीला बोलता येत नव्हते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी जबाब घेण्यात आला.

०४. माझ्या पतीला ज्या कोयत्याने मारहाण झाली तो दाखवल्यास मी ओळखू शकेन. आता मला दाखवण्यात आलेला कोयता मटेरियल ऑब्जेक्ट–१ (MO-1) तोच आहे. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपींकरीता वकील सौ. मानसी म्हात्रे यांचेमार्फत</u>** :

०५. हे म्हणणे खरे आहे की, गावातील रस्त्याचे काम ग्रामपंचायत करत होती. हे म्हणणे खरे आहे की, काम चालू असताना आमचा पत्रा तुटला होता. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या कामाशी नरेश वर्तकचा काहीही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, नरेश वर्तक याने नुकसान भरपाई करुन देतो असे माणुसकीच्या नात्याने सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, नरेश वर्तकचा आमच्या झाडाच्या फांद्याशी संबंध नाही.

०६. हे म्हणणे खरे आहे की, तंटामुक्तीमध्ये झाडाच्या फांद्याचा वाद गेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी आम्ही कबुल केले होते की, रस्त्यावर येणाऱ्या फांद्या आम्ही तोडू. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे आम्ही फांद्या तोडल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, गुरुनाथ व नवनाथ हे आमच्या फांद्याबाबत तक्रार करणारे प्रमुख होते. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही शिंदे गटातील आहोत व आरोपी शेतकरी कामगार पक्षातील आहेत.

०७. हे म्हणणे खरे आहे की, आमचे घर भर वस्तीत आहे. हे म्हणणे

खरे आहे की, घटना आजूबाजूच्या लोकांनी पाहिली होती. मला घटना कोणी कोणी पाहिली त्यांची नावे सांगता येणार नाहीत. रक्त कपड्यांवर, अंगावर, गाडीवर पडले होते. पोलीसांना रक्ताने माखलेले कपडे आम्ही दिलेले नाहीत.

**प्रश्न** : पोलीसांना रक्त दाखवले होते का?
**उत्तर** : पोलीस २६ तारखेला आले त्यावेळी रक्त पुसून गेले होते.

०८. पोलीसांना रक्ताने माखलेली बनियन दाखवली होती. पोलीसांनी ती जप्त केली नव्हती. २२ तारखेला मला बोलता येत होते. २२ तारखेला मी तक्रार दिली नव्हती. २२ तारखेला माझ्या पतीला शुद्ध नव्हती. माझ्या पतीला २३ तारखेला शुद्ध आली. मी स्वतःहून जावून २३ तारखेला पोलीस ठाण्यात तक्रार दिली नाही.

**प्रश्न** : २६ तारखेपयत तुम्ही स्वत: तक्रार दिली नव्हती?
**उत्तर** : पोलीसांनी सांगितले होते की पतीला शुद्ध आल्यानंतर तक्रार घेवू.

०९. माझ्या घरात ३ ते ४ कोयते आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या घरातील कोयता काढून पोलीसांना दिला. हे म्हणणे खरे नाही की, गुरुनाथने माझ्या पतीला कोयत्याने तोंडावर मारले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तंटामुक्तीमध्ये आम्हला फांद्या तोडायला लावल्या होत्या म्हणून आम्ही आरोपींविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीला घरगुती काम करताना तोंडाला लागले होते म्हणून मी खोटी केस दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, नरेश वर्तक, गुरुनाथ व नवनाथ यांच्यावर आमचा राग असल्यामुळे आम्ही त्यांच्याविरुद्ध खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचा या कोयत्याशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे

खरे नाही की, कोयता आमच्या घरातील आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग. ( **एम्. बी. अत्तार** )
दिनांक : **१६/१२/२०२५**. मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

**R.C.No. 71/2024**
Exh. **30/C**

Deposition of Witness No. **04** for the State
(**THROUGH VIDEO CONFERENCING**)

I do hereby on solemn affirmation state that :-

My Name : **Dr. Vitthal Tejrao Hingne**
Age about : 32 Years, Occupation : Medical Officer, Gondia
Residence : Doing Post-Graduate in Gondia

**Examination-in-Chief by A.P.P. Shri. P. S. Patil** :

1. I am qualified as an M.B.B.S. and am presently pursuing an M.D. in Pharmacology. On 22/03/2024, I was attached to Civil Hospital, Alibag, as a Medical Officer. My duty hours were from 9:00 p.m. to 9:00 a.m. On that day, a patient named Prakash Jagannath Thakur came to the hospital along with his relatives. He narrated a history of assault and complained of giddiness and an injury over his upper lip. On that day, I examined him and found the following injury:

    1. CLW over upper lip size 1x0.5 cm. It was blunt injury.

2. Accordingly, I issued injury certificate. The injury certificate now showed to me is the same. Its contents are true and correct and it bears my signature. It is marked as **Exh. 31**. The injury mentioned above is possible by the handle of sickle now shown to me. (Material Object-1)

**Examination-in-Chief completed**.

**<u>Cross-Examination for accused by Adv. Sau. Manasi Mhatre</u>** :

3. It is true to say that, considering the dimension of the injury, it was of a negligible nature. It is true to say that the Investigating Officer had not shown me the weapon nor taken my opinion regarding it. It is true to say that if a person is assaulted with the handle of the sickle, which is now shown to me, a bleeding injury is possible. It is true to say that such an injury is also possible if a person is dashed against a hard surface or bites his lip. It is true to say that the patient had not narrated to me the detailed history of the assault.

Cross-examination completed.

No Re-examination

R. O. & A. C.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **24/02/2026**.

:: **C E R T I F I C A T E** ::

Taken before me and signed by me in the presence of accused to whom the deposition is explained in vernacular and full opportunity to cross-examine the witness, is given.

( **M. B. Attar** )
Chief Judicial Magistrate,
Raigad-Alibag

Alibag.
Dt. **24/02/2026**.